तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, दोडामार्ग
ग्रामिण रुग्णालय दोडामार्ग परिसर तालुका - दोडामार्ग
Email thododamarg@gmail.com, दुरध्वनी क्र.०२३६३ -291006
जाक्र.ताआअकादो/एनएचएम/आस्था/दरपत्रक/553/२०२६ दि. १३/११/२०२६

दरपत्रक मागणी

तालुका आरोग्य आरोग्य अधिकारी कार्यालय दोडामार्ग अंतर्गत वर्षात आरोग्य विषयक जनजागती करिता प्रभातफेरी, मॅरेथॉन व इतर आरोग्यविषयक कार्यक्रम प्रसिध्दीकरिता स्वयमसेवक, शालेय विदयार्थी इत्याकरिता आरोग्य विषयक संदेश देणारे T-Shirt/ Cap खरेदी करणेचे आहे. करीता पुरवठा करणेस इच्छुक दरपत्रक धारकांकडून खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

Sr No	Particulars	Required Minimum Quantity	**पुरवठाधारकाने सादर करावयाचे दर** (Per Unit)
	T-Shirt & Cap with printing		
1	डॉट निक फॅब्रिक गोल गळा टिशर्ट लोग व मागील प्रिंट सहीत (Size : S, M, XL, XXL) As Per Requirement)	100	
2	डॉट निक फॅब्रिक कॉलर टिशर्ट लोग व मागील प्रिंट सहीत (Size : S, M, XL, XXL) As Per Requirement)	100	
3	जेकार्ड फॅब्रिक गोल गळा टिशर्ट लोग व मागील प्रिंट सहीत (Size : S, M, XL, XXL) As Per Requirement)	100	
4	जेकार्ड फॅब्रिक कॉलर टिशर्ट लोग व मागील प्रिंट सहीत (Size : S, M, XL, XXL) As Per Requirement)	100	
5	सॉफ्टी फॅब्रिक गोल गळा टिशर्ट लोग व मागील प्रिंट सहीत	100	
6	सॉफ्टी फॅब्रिक कॉलर टिशर्ट लोग व मागील प्रिंट सहीत	100	
7	कॅप लोग प्रिंट सहीत	100	

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस संकेतस्थळावर प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 7 दिवसाच्या मुदतीत रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत विहित नमून्यात परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल.

दरपत्रकाच्या अटी व शर्ती

01) दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रका सोबत शासकिय संस्थेमार्फत दिलेला नोंदणी दाखला / जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच नोंदणीपत्रकावर नमूद मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत जोडावयाचे आहेत. दरपत्रक सोबत सादर करावयाच्या बंद लखोटयांत सदरची नोंदणी प्रमाणपत्र व मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा सदरची दरपत्रक नामंजूर करणेत येतील.

02) तसेच नमुद दर हे सर्व प्रकारच्या करासहित तसेच या कार्यालयास पोंच करावयाच्या वाहतूक खर्चासहित सादर करावेत. त्या व्यतिरिक्त अन्य कोणतेही दर/चार्जिस अदा केले जाणार नाहीत.

03) ज्या दरपत्रक धारकांचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी आदेश दिलेपासून दरपत्रकात नमूद दरानुसार पुरवठा सात दिवसांत पूर्ण करणे बंधनकारक राहिल अन्यथा शासननियमानुसार दंड आकारण्यात येईल. तसेच वस्तुच्या नग संख्येमध्ये आवश्यकतेप्रमाणे अनुदानाच्या उपलब्धते नुसार कमी अधिक बदल होवु शकतो.

04) मंजूर दरपत्रकानुसार सदर काम पूर्ण झालेवर सर्व करांसहित देयक त्वरीत कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. देयक संबधीत मक्तेदाराच्या बॅकखातेवर पीएफएमएस / NEFT प्रणालीनुसार देयकाची रक्कम जमा करणेत येईल.

05) विहित मुदतीत दरपत्रके प्राप्त न झालेस अथवा पुरवठा आदेश दिलेपासून काम 07 दिवसांत पुरवठा न झालेस सदर पत्रक नाकारण्याचे अधिकार खाली स्वाक्षरी करणार यांचे रहातील. पोस्टाने पाठविलेल दरपत्रक उशीराने प्राप्त झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

06)सिंधुदुर्ग मधील स्थानिक पुरवठादार यांना प्राधान्य राहील व वस्तुचे दर माहे नोव्हेंबर 2026 ते मार्च 2027 या कालावधीसाठी निश्चित राहतील याची नोंद घ्यावी.

तालुका आरोग्य अधिकारी
तालुका - दोडामार्ग

दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण
तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, नोटीसबोर्ड
www.nrhm.maharashtra.gov.in, www.arogya.maharashtra.gov.in

वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 7 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.